# मेट्रो ३ : भुयारांचे काम वेगात

**मुंबई** : कुलाबा-वांद्रे-सिप्झ या तिसऱ्या संपूर्णतः भुयारी मेट्रो मार्गादरम्यानच्या भुयारी मार्गाचे काम वेगाने पूर्ण करण्यात येत असून, मागील २४ तासांत दोन ब्रेक थ्रू करण्यास एमएमआरसीएलला यश मिळाले आहे. यामध्ये पॅकेज ५ मधील मिठी नदी व पॅकेज ४ मधील वरळीपर्यंतच्या भुयारांचा समावेश आहे.

कुलाबा-वांद्रे-सिप्झ या मेट्रो ३ मार्गिकेचे भुयार खणण्याचे काम वेगाने सुरू आहे. मंगळवारी दुपारी मेट्रो ३ मार्गिकेदरम्यानच्या २६ वा ब्रेक थ्रू करण्यात आला. एका भुयारातून सुरू झालेल्या टीबीएमचे काम दुसऱ्या भुयारापर्यंत पूर्ण करण्यासाठी प्रत्येक टीबीएमला वेगवेगळा वेळ लागत आहे. मंगळवारी दुपारी १ च्या सुमारास सिद्धिविनायक ते वरळीदरम्यानच्या भुयाराचे काम पूर्ण करण्यात आले. पॅकेज ४ मधील या भुयाराची लांबी १०.९६ किमी असून, जवळपास ९.०६ किमीचे काम टीबीएमच्या माध्यमातून पूर्ण करण्यात आले आहे. कृष्णा ३ या टीबीएमने जवळपास १.२८ किमी भुयाराचे काम ९१६ सेंग्मेंट रिंग्जच्या माध्यमातून पूर्ण केले आहे.



## सप्टेंबर २०२० पर्यंत काम पूर्ण करण्याचा मानस

तर बुधवारी २७ वा ब्रेक थ्रू मिठी नदीजवळील एका भुयाराच्या खोदकामातून पूर्ण करण्यात आला आहे. गोदावरी टीबीएमच्या माध्यमातून १.५ किमी. भुयार आणि एकूण ७.५ किमी. भुयार खोदण्यात आले आहे. जवळपास २८७ दिवस सातत्याने टीबीएमच्या माध्यमातून १०७२ सेग्मेंट रिंग्जचा वापर करून भुयाराचे काम पूर्ण करण्यात आले आहे. सध्या 'मेट्रो ३' च्या कामकाजासाठी १७ टीबीएम कार्यरत असून, सप्टेंबर २०२० पर्यंत 'मेट्रो ३' च्या भुयाराचे काम पूर्ण करण्याचा मानस एमएमआरसीएलकडून व्यक्त करण्यात आला आहे.